क्र. पोमसं/३-अ/१०/जीटी-१६/रापोनि/०९/२०१६
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- १७/०५/२०१६.

वाचा :- १) महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम २०१४, व
२) महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश-२०१५, दि.१६/०२/२०१५.

आदेश :

उपरोक्त संदर्भात नमूद अध्यादेशातील कलम २२ न (१) (क) (अ) अन्वये विहीत केलेल्या तरतुदींनुसार राखीव पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदलीकरिता सक्षम प्राधिकारी, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२, यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेनुसार **खालील विवरणपत्रांतील राखीव पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या ह्या, विहित कालावधी पूर्ण झाल्याने/ प्रशासकीय कारणांस्तव, व विनंतीनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहेत:-**

| अ.क्र. | राखीव पोलीस निरीक्षकाचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | दत्तात्रय माधव भंडारवार | यवतमाळ | गडचिरोली | विहित कालावधी पूर्ण झाल्याने प्रशासकीय कारणास्तव |
| २ | रामानंद फौजदार सिंह | गडचिरोली | नागपूर शहर | विहित कालावधी पूर्ण झाल्याने दि. ३०/०६/२०१६(म.नं) रोजी होणा-या रिक्त पदात. |
| ३ | महादेव गुंडा गडदे | नंदूरबार | ठाणे ग्रामीण | विनंतीवरुन |
| ४ | अरमान झिपरा तडवी | उस्मानाबाद | नंदूरबार | विनंतीवरुन |
| ५ | भालचंद्र लक्ष्मण लवंदे | पो. प्र. केंद्र, तुरची- तासगांव | बृहन्मुंबई | विनंतीवरुन |
| ६ | आनंदा हरि शिमणे | सिंधुदुर्ग | पो.प्र.केंद्र,मरोळ | विनंतीवरुन |

२. संबंधीत घटक प्रमुखांनी या आदेशांची प्रत, आणि बदली ठिकाणी कार्यमुक्त करण्यात आलेल्या आदेशांची प्रत, उक्त राखीव पोलीस निरीक्षकांना व्यक्तिशः अदा करुन, त्या आदेशांच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून, त्या पोंच या कार्यालयास सत्वर सादर कराव्यात.

३. संबंधीत घटक प्रमुखांनी **उपरोक्त बदली आदेशाधिन असलेल्या उक्त राखीव पोलीस निरीक्षकांना बदलीवर सोडताना पर्यायी/ बदलीवर येणा-या राखीव पोलीस निरीक्षकांची वाट न पाहता, बदलीवरील नेमणुकीच्या**

**ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.** तसेच, सदर राखीव पोलीस निरीक्षकांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा दिनांक संबंधीत घटक प्रमुखांनी, **या कार्यालयास दिनांक ३१/०५/२०१६ पुर्वी (कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन)** निश्चितपणे कळवावा.

४. संबंधीत घटक प्रमुखांनी, **त्यांच्या घटकात बदलून येणारे जे राखीव पोलीस निरीक्षक या आदेशांनुसार बदलीवर नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत, त्यांची नावे** कृपया या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे कळवावीत. तसेच, **त्यांच्या घटकातून बदलून जाणारे जे राखीव पोलीस निरीक्षक बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्णनिवेदन करतील, अशा राखीव पोलीस निरीक्षकांनाही त्यांनी रुग्णनिवेदन केलेल्या दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relieved) दर्शविण्यात यावे,** आणि त्याबाबतचा स्वतंत्र अहवालदेखील या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे सत्वर सादर करावा. तसेच, संबंधीत घटक प्रमुखांनी **अशा संबंधीत राखीव पोलीस निरीक्षकांविरुध्द या कार्यालयाचे पत्र क्र. २/५५/०७, दि. १६/०९/१९८३, दि. ११/०१/१९८४, व दि. १०/०२/१९९१, तसेच परिपत्रक क्र.पोमसं/३/५५०७/६/९, दि. १३/०२/१९९७ मधील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, व तसाही अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन सत्वर सादर करावा.**

५. बदलीच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबधीत घटक प्रमुखांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

६. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

**प्रबीण दीक्षित**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
पोलीस आयुक्त नागपूर शहर
पोलीस अधिक्षक, यवतमाळ/ गडचिरोली/ नंदूरबार/ ठाणे ग्रामीण/ उस्मानाबाद /सिंधुदुर्ग
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ/ तुरची-तासगांव

**प्रत सविनय सादर :-**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२

**प्रत सादर,**

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक , कोंकण परिक्षेत्र/ नागपूर परिक्षेत्र/अमरावती परिक्षेत्र/नाशिक परिक्षेत्र

**प्रत आवश्क त्या कार्यवाहीसाठी :-**

महालेखापाल-१, मुंबई व महालेखापाल-२, नागपूर. (सस्नेह)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
कोषाधिकारी यवतमाळ/ गडचिरोली/ नंदूरबार/ ठाणे ग्रामीण/ उस्मानाबाद/सांगली/सिंधुदुर्ग
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई (सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

प्रत :-

कार्यासन अधिकारी, का.क्र. २, ५-अ, ९, ११, ११-अ, १४, २८, ३६ व ४०.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता